# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा

### कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (दोन वर्ष, मराठी माध्यम) प्रवेश सुचना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला कार्यक्षेत्रा अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (दोन वर्ष, मराठी माध्यम) प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे मार्फत राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्ष | उमेदवार महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ.१०वी ) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. |

डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला अंतर्गत निकृशि विद्याशाखेच्या कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पध्दतीने पूर्ण करण्यात येणार आहे. **याकरिता आवश्यक प्रवेश माहिती पुस्तिका तसेच अर्ज भरण्याची लिंक डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे संकेतस्थळ https://www.pdkv.ac.in यावर दिनांक ०२/०६/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबायची कार्यपद्धती**

- उमेदवाराने https://www.pdkv.ac.in या संकेतस्थळाद्वारे **ऑनलाइन प्रवेशअर्ज भरण्याची लिंक दिनांक ०१/०७/२०२६ पर्यंत उपलब्ध राहील.** या नंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध नसेल.
- ऑनलाइन अर्ज भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे (रंगीत) छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी,संबंधीत मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे स्कॅन करून संकेत स्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे स्वत:/ईतराद्वारे /टपालाने/कुरीयरने कार्यालयाला पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश शुल्क डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग किंवा **UPI (Unified Payment Interface)** द्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरवायचे शुल्क**

- खुल्या प्रवर्गाकरिता रु. ५००/-, आरक्षित प्रवर्गाकरिता रु. २५०/-(अ.जा./अ.ज./वि.जा.*/भ.ज.*/इ.मा.व.*/ वि. मा.व.*) (*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.) प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशीलाचा अंतर्भाव असलेली कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्ष-मराठी माध्यम) प्रवेश माहिती पुस्तिका शैक्षणिक सत्र २०२६-२७ उपरोक्त संकेत स्थळावर दि. ०२ जुन,२०२६ पासून उपलब्ध आहे.

( प्रिती टेकाळे )
कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला